# पोलीस शिपाई भरती २०२२-२०२३

महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम, २०११ व त्यामध्ये शासनाने वेळोवेळी केलेल्या आणि दिनांक २३.६.२०२२ च्या सेवाप्रवेश नियमात केलेल्या सुधारीत तरतुदींनुसार पोलीस अधीक्षक, सातारा यांचे आस्थापनेवरील पोलीस शिपाई पदांची एकूण १९६ रिक्त असलेली पदे भरण्यासाठी आवेदनपत्र संगणकीय प्रणालीद्वारे **दिनांक ०५/०३/२०२४ ते ३१/०३/२०२४ या कालावधीत** स्विकारण्यात येतील. ह्या बाबतची सविस्तर माहिती policerecruitment2024.mahait.org **आणि** www.mahapolice.gov.in या संकेतस्थळांवर उमेदवारांच्या माहितीकरिता प्रसिद्ध करण्यात आली आहे.

- उमेदवारास पोलीस आयुक्त / पोलीस अधीक्षक यांच्या आस्थापनेवरील पोलीस शिपाई या पदासाठी ऑनलाईन आवेदन अर्ज सादर करता येईल. ऑनलाईन पध्दतीने आवेदन अर्ज सादर करण्याची सुविधा policerecruitment2024.mahait.org या संकेतस्थळावर उपलब्ध राहणार आहे.
- उमेदवार एका पदाकरिता संपूर्ण महाराष्ट्र राज्यात फक्त एका घटकात अर्ज करु शकतो.
- उमेदवाराने चुकीची माहिती दिल्यास, उमेदवारी कोणत्याही टप्प्यावर रद्द होईल.
- पोलीस शिपाई या पदासाठी अर्ज केलेल्या उमेदवाराची प्रथम ५० गुणांची शारीरीक चाचणी परीक्षा घेण्यांत येईल व त्यानंतर होणारी लेखी परीक्षा ही **सर्व पोलीस घटकांमध्ये लेखी परीक्षा एकाच दिवशी आयोजित करण्यांत येईल. त्यासाठी अर्जदाराने ऑनलाईन आवेदन अर्ज भरतेवेळी सदरची बाब विचारात घेऊनच आवेदन अर्ज भरावा.**
- **भरती प्रक्रियेमध्ये प्रथम शारीरिक चाचणी घेण्यात येणार आहे. शारिरीक योग्यता चाचणीमध्ये किमान ५० टक्के गुण मिळविणारे उमेदवारांमधून संबंधित प्रवर्गामधील जाहिरात दिलेल्या रिक्त पदाच्या १:१० प्रमाणात उमेदवारांची १०० गुणांची लेखी परीक्षा घेण्यात येईल. उमेदवारांना लेखी परीक्षेमध्ये किमान ४० टक्के गुण मिळविणे अनिवार्य आहे. लेखी परीक्षेमध्ये ४० टक्केपेक्षा कमी गुण असलेले उमेदवार अपात्र समजण्यात येतील.**
- **सर्व पोलीस घटकांमध्ये लेखी परीक्षा एकाच दिवशी आयोजित करण्यांत येईल. त्यासाठी अर्जदाराने ऑनलाईन आवेदन अर्ज भरतेवेळी सदरची बाब विचारात घेऊनच आवेदन अर्ज भरावा.**
- **शारिरीक चाचणी व लेखी चाचणी यामध्ये नमूद केलेल्या दोन निकषांच्या निकालाच्या आधारे उमेदवारांमधुन एक गुणवत्तायादी तयार केली जाईल.** तात्पुरत्या निवडसूचीमध्ये समावेश झालेल्या उमेदवारांचीच मूळ कागदपत्रे पडताळणी करण्यात येतील. कागदपत्र पडताळणीत पात्र ठरलेल्या उमेदवारांचा निवडसूचीमध्ये समावेश केला जाईल. निवडसूचीतील उमेदवाराची निवड तात्पुरती (Provisional selection) असेल. **शारिरीक चाचणी व लेखी चाचणी यामध्ये मिळालेल्या गुणांचे एकत्रिकरण केल्यानंतर, गृहविभाग शासन निर्णय, दि.१०.१२.२०२० नुसार अंतिम गुणवत्तायादी तयार करण्यांत येईल.**
- पोलीस शिपाई पदासाठी आवश्यक असलेली शैक्षणिक अर्हता, शारिरीक पात्रता, आवश्यक असलेली प्रमाणपत्रे / कागदपत्रे, सामाजिक व समांतर आरक्षणाबाबची माहिती, परीक्षा शुल्क, आवेदन अर्ज सादर करण्याबाबतची माहिती, अर्ज सादर करण्याचा दिनांक व वेळ आणि उमेदवारांसाठी सविस्तर सूचना policerecruitment2024.mahait.org या संकेतस्थळावर दिलेल्या सविस्तर जाहिरातीमध्ये उपलब्ध आहेत. **सदरहू जाहिरात उमेदवारांनी काळजीपूर्वक वाचून, समजून घ्यावी. तसेच, सामाजिक, समांतर आरक्षण व अनाथांकरीता उपलब्ध पदांच्या १% आरक्षित जागा विचारात घेऊन रिक्त पदांबाबतची खातरजमा करावी व त्यानंतरच उमेदवारांनी ऑनलाईन पध्दतीने आवेदन अर्ज सादर करावेत.**
- **भरती प्रक्रियेदरम्यान शारीरिक चाचणी व लेखी चाचणीमध्ये निश्चित केलेल्या दिनांकास उमेदवार गैरहजर राहिल्यास, त्यास भरती प्रक्रियेतून बाद ठरविण्यात येईल. कार्यालयाने एकदा निश्चित केलेल्या दिनांकामध्ये कोणत्याही परीस्थितीत बदल करण्यात येणार नाही.**
- उमेदवारांनी संकेतस्थळावर जावुन आवेदन अर्ज सादर करावयाचा आहे, त्या घटकात रिक्त असलेली पदे विचारात घेऊनच उमेदवाराने अर्ज सादर करावेत. मागासवर्गीय उमेदवार खुल्या प्रवर्गात (Unreserved) अर्ज करु शकतात, परंतू खुल्या प्रवर्गातील (Unreserved) उमेदवार मागासवर्गीय प्रवर्गात अर्ज करु शकणार नाहीत.
- पदोन्नतीवरील आरक्षणासंदर्भात शासनाने मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्रमांक २८३०६/२०१७ बाबत होणाऱ्या अंतिम निर्णयाच्या आदेशाच्या अधिन राहून व मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी जनहित याचिका क्रमांक १७५/२०१८ व इतर संलग्न याचिकांमध्ये दिनांक २७.०६.२०१९ रोजी दिलेल्या निर्णयाविरुध्द मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल झालेल्या याचिकेबाबत होणाऱ्या अंतिम निर्णयाच्या अधिन राहून रिक्त पदांची गणना केलेली आहे. त्यामुळे जाहीरातीमध्ये नमूद केलेल्या रिक्त पदांच्या संख्येमध्ये बदल होऊ शकतो व त्याची माहिती वेळोवेळी संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल. त्यानुसार नियुक्ती अधिकारी यांना पदे भरण्याचा अधिकार आहे.

**( समीर शेख )**
**पोलीस अधीक्षक, सातारा.**

# महाराष्ट्र राज्य पोलीस शिपाई भरती सन २०२२-२०२३

पोलीस अधीक्षक, सातारा.

**जाहिरात क्रमांक : ०१** **ठिकाण : सातारा** **दिनांक : ०१/०३/२०२४**

महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम २०११ व त्यानंतर शासनाने वेळोवेळी आणि दिनांक २३.०६.२०२२ च्या आदेशांन्वये केलेल्या सुधारणांनुसार पोलीस अधीक्षक, सातारा यांच्या आस्थापनेवर सन २०२२-२०२३ मध्ये पोलीस शिपाई संवर्गात रिक्त होणारी १९६ पदे भरण्यासाठी पोलीस शिपाई पदाची भरती आयोजित करण्यात येत आहे.

**१) पोलीस शिपाई**

| | अ.जा. | अ.ज. | वि.ज.-अ | भ.ज.-ब | भ.ज.-क | भ.ज.-ड | विमाप्र | इमाव | एसईबीसी | इडब्ल्यूएस | अराखीव | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **एकूण** | ३८ | ३२ | १२ | १४ | १० | ८ | ९ | ६४ | ५ | ४ | ० | १९६ |
| **कप्पीकृत आरक्षण ⬇** | | | | | | | | | | | | |
| **सर्वसाधारण** | ११ | ७ | २ | ४ | १ | ५ | ५ | २० | २ | २ | ० | ५९ |
| **महिला** | ११ | १० | ४ | ४ | ३ | २ | ३ | १९ | २ | १ | ० | ५९ |
| **खेळाडु** | २ | २ | १ | १ | १ | ० | ० | ३ | ० | ० | ० | १० |
| **प्रकल्पग्रस्त** | २ | २ | १ | १ | १ | ० | ० | ३ | ० | ० | ० | १० |
| **भुकंपग्रस्त** | १ | १ | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | ० | ० | ३ |
| **माजी सैनिक** | ६ | ५ | २ | २ | २ | १ | १ | १० | १ | १ | ० | ३१ |
| **अंशकालीन पदवीधर** | २ | २ | १ | १ | १ | ० | ० | ३ | ० | ० | ० | १० |
| **पोलीस पाल्य** | १ | १ | ० | ० | ० | ० | ० | २ | ० | ० | ० | ४ |
| **गृहरक्षक दल** | २ | २ | १ | १ | १ | ० | ० | ३ | ० | ० | ० | १० |
| **अनाथ** | **महिला व बाल विकास विभाग शासन निर्णय क्रमांक अनाथ २०२२/प्र.क्र.१२२का-०३, दिनांक ०६.०४.२०२३ मधील तरतुदीनुसार नुसार एकुण रिक्त पदांच्या १% इतकी पदे.** | | | | | | | | | | | |

**बॅण्डस्मॅन पदासाठी टिप** :- वरिल नमुद रिक्त पदामध्ये एकुण १२ बॅण्डस्मॅनची पदे समाविष्ठ आहेत.

**महत्त्वाची टीप:-**

जिल्हा पोलीस शिपाई भरती करण्याबाबत कोणीही पैशाची किंवा अन्य कोणत्याही स्वरुपाची मागणी केल्यास संबंधीत उमेदवाराने त्याबाबतची माहिती अॅन्टीकरप्शन ब्युरो, सातारा यांना दुरध्वनी क्रमांक ०२१६२-२३८१३९ वर त्वरीत संपर्क साधून तक्रार करावी. तसेच, या संदर्भात उमेदवार पोलीस अधीक्षक, सातारा या कार्यालयातील वरिष्ठ अधिकाऱ्यांशी किंवा अध्यक्ष, पोलीस भरती समिती-२०२२-२०२३ तथा पोलीस अधीक्षक, सातारा यांच्याशी संपर्क साधून तक्रार करु शकतील.

उमेदवारांना काही अडचणी आल्यास खालील दिलेल्या हेल्पलाईन नंबरवर कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा.

| अ.क्र. | संस्था / कार्यालयाचे नाव | दुरध्वनी क्रमांक |
|---|---|---|
| १. | पोलीस अधीक्षक, सातारा | ०२१६२-२३४१३० |

(समीर शेख)
**पोलीस अधीक्षक, सातारा.**

## पोलीस शिपाई चालक भरती २०२२-२०२३

महाराष्ट्र सहायक पोलीस उपनिरीक्षक चालक, पोलीस हवालदार चालक, पोलीस नाईक चालक व पोलीस शिपाई चालक (सेवाप्रवेश) नियम, २०१९ व त्यानंतर शासनाने वेळोवेळी केलेल्या सुधारणा आणि दिनांक २७.०६.२०२२, दिनांक २३.०९.२०२२ अन्वये सेवाप्रवेश नियमात केलेल्या सुधारीत तरतुदींनुसार पोलीस दलातील पोलीस अधीक्षक, सातारा यांचे आस्थापनेवरील पोलीस शिपाई चालक पदांची एकूण ३९ रिक्त असलेली पदे भरण्यासाठी देखील आवेदनपत्र संगणकीय प्रणालीद्वारे **दिनांक ०५/०३/२०२४ ते ३१/०३/२०२४ या कालावधीत** स्विकारण्यात येतील. ह्या बाबत सविस्तर माहिती policerecruitment2024.mahait.org **आणि** www.mahapolice.gov.in या संकेतस्थळांवर उमेदवारांच्या माहितीकरिता प्रसिद्ध करण्यात आली आहे.

- उमेदवारास पोलीस अधीक्षक, सातारा यांच्या आस्थापनेवरील पोलीस शिपाई चालक या पदांसाठी ऑनलाईन आवेदन अर्ज सादर करता येईल. ऑनलाईन पध्दतीने आवेदन अर्ज सादर करण्याची सुविधा policerecruitment2024.mahait.org या संकेतस्थळावर उपलब्ध राहणार आहे.
- उमेदवार एका पदाकरिता संपूर्ण महाराष्ट्र राज्यात फक्त एका घटकात अर्ज करु शकतो.
- उमेदवाराने चुकीची माहिती दिल्यास, उमेदवारी कोणत्याही टप्प्यावर रद्द होईल.
- पोलीस शिपाई चालक या पदांसाठी अर्ज सादर केलेल्या उमेदवाराची प्रथम ५० गुणांची शारीरीक चाचणी घेण्यात येईल. सदर शारिरिक चाचणीत किमान ५० टक्के गुण प्राप्त करणारे उमेदवार, संबंधित प्रवर्गामधील जाहिरातीत नमूद केलेल्या रिक्त जागांच्या १:१० या प्रमाणात उमेदवार लेखी परीक्षेसाठी पात्र ठरतील.
- **लेखी चाचणीसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांना, हलके मोटार वाहन चालविण्याची चाचणी २५ गुणांची व जीप प्रकारातील वाहन चालविण्याची चाचणी २५ गुणांची अशी एकूण ५० गुणांची कौशल्य चाचणी द्यावी लागेल. सदर दोन्ही चाचण्यांमध्ये एकत्रित किमान ४० टक्के गुण मिळवून उमेदवारास उत्तीर्ण व्हावे लागेल. कौशल्य चाचणी ही केवळ एक अर्हता चाचणी असून कौशल्य चाचणीत मिळालेले गुण, गुणवत्ता यादी तयार करण्यासाठी विचारात घ्यावयाच्या एकुण गुणात समाविष्ट केले जाणार नाहीत. कौशल्य चाचणीत उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांची १०० गुणांची लेखी परीक्षा घेण्यात येईल.**
- **सर्व पोलीस घटकांमध्ये लेखी परीक्षा एकाच दिवशी आयोजित करण्यांत येईल. त्यासाठी अर्जदाराने ऑनलाईन आवेदन अर्ज भरतेवेळी सदरची बाब विचारात घेऊनच आवेदन अर्ज भरावा.**
- शारिरीक चाचणी व लेखी परीक्षामध्ये प्राप्त केलेल्या एकूण गुणांच्या आधारे उमेदवारांची गुणवत्तेनुसार तात्पुरती निवडसूची तयार करण्यात येईल. तात्पुरत्या निवडसूचीमध्ये समावेश झालेल्या उमेदवारांचीच मूळ कागदपत्रे पडताळणी करण्यात येतील. कागदपत्र पडताळणीत पात्र ठरलेल्या उमेदवारांचा निवडसूचीमध्ये समावेश केला जाईल. निवडसूचीतील उमेदवाराची निवड तात्पुरती (Provisional selection) असेल. **शारिरीक चाचणी व लेखी चाचणी यामध्ये मिळालेल्या गुणांचे एकत्रिकरण केल्यानंतर, गृहविभाग शासन निर्णय, दि.१०.१२.२०२० नुसार अंतिम गुणवत्तायादी तयार करण्यांत येईल.**
- पोलीस शिपाई चालक पदासाठी आवश्यक असलेली शैक्षणिक अर्हता, शारिरीक पात्रता, आवश्यक असलेली प्रमाणपत्रे / कागदपत्रे, सामाजिक व समांतर आरक्षणाबाबची माहिती, परीक्षा शुल्क, आवेदन अर्ज सादर करण्याबाबतची माहिती, अर्ज सादर करण्याचा दिनांक व वेळ आणि उमेदवारांसाठी सविस्तर सूचना policerecruitment2024.mahait.org या संकेतस्थळावर दिलेल्या सविस्तर जाहिरातीमध्ये उपलब्ध आहेत. **सदरहू जाहिरात उमेदवारांनी काळजीपूर्वक वाचून, समजून घ्यावी. तसेच, सामाजिक, समांतर आरक्षण व अनाथांकरीता उपलब्ध पदांच्या १% आरक्षित जागा विचारात घेऊन रिक्त पदांबाबतची खातरजमा करावी व त्यानंतरच उमेदवारांनी ऑनलाईन पध्दतीने आवेदन अर्ज सादर करावेत.**
- **भरती प्रक्रियेदरम्यान शारिरिक चाचणी व लेखी चाचणीमध्ये निश्चित केलेल्या दिनांकास उमेदवार गैरहजर राहिल्यास, त्यास भरती प्रक्रियेतून बाद ठरविण्यात येईल. कार्यालयाने एकदा निश्चित केलेल्या दिनांकामध्ये कोणत्याही परीस्थितीत बदल करण्यात येणार नाही.**
- उमेदवारांनी संकेतस्थळावर जावुन आवेदन अर्ज सादर करावयाचा आहे, त्या घटकात रिक्त असलेली पदे विचारात घेऊनच उमेदवाराने अर्ज सादर करावेत. मागासवर्गीय उमेदवार खुल्या प्रवर्गात (Unreserved) अर्ज करु शकतात, परंतू खुल्या प्रवर्गातील (Unreserved) उमेदवार मागासवर्गीय प्रवर्गात अर्ज करु शकणार नाहीत.
- पदोन्नतीवरील आरक्षणासंदर्भात शासनाने मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्रमांक २८३०६/२०१७ बाबत होणाऱ्या अंतिम निर्णयाच्या आदेशाच्या अधिन राहून व मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी जनहित याचिका क्रमांक १७५/२०१८ व इतर संलग्न याचिकांमध्ये दिनांक २७.०६.२०१९ रोजी दिलेल्या निर्णयाविरुध्द मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल झालेल्या याचिकेबाबत होणाऱ्या अंतिम निर्णयाच्या अधिन राहून रिक्त पदांची गणना केलेली आहे. त्यामुळे जाहीरातीमध्ये नमूद केलेल्या रिक्त पदांच्या संख्येमध्ये बदल होऊ शकतो व त्याची माहिती वेळोवेळी संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल. त्यानुसार नियुक्ती अधिकारी यांना पदे भरण्याचा अधिकार आहे.

**( समीर शेख )**
**पोलीस अधीक्षक, सातारा.**

## महाराष्ट्र राज्य पोलीस शिपाई चालक भरती सन २०२२-२०२३

पोलीस अधीक्षक, सातारा.

**जाहिरात क्रमांक : ०२** **ठिकाण : सातारा** **दिनांक : ०१/०३/२०२४**

महाराष्ट्र सहायक पोलीस उपनिरीक्षक चालक, पोलीस हवालदार चालक, पोलीस नाईक चालक व पोलीस शिपाई चालक (सेवाप्रवेश) नियम, २०१९ व त्यानंतर शासनाने वेळोवेळी केलेल्या सुधारणा आणि दिनांक २७.०६.२०२२, दिनांक २३.०९.२०२२ च्या केलेल्या सुधारीत तरतुदींनुसार पोलीस अधीक्षक, सातारा यांच्या आस्थापनेवर सन २०२२-२०२३ मध्ये पोलीस शिपाई चालक संवर्गात रिक्त होणारी एकुण ३९ रिक्त पदे भरण्यासाठी पोलीस शिपाई चालक पदाची भरती आयोजित करण्यात येत आहे.

**२) पोलीस शिपाई चालक**

| | अ.जा. | अ.ज. | वि.ज-अ | भ.ज-ब | भ.ज-क | भ.ज-ड | विमाप्र | इमाव | एसईबीसी | ईडब्ल्यूएस | अराखीव | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **एकूण** | ५ | ३ | १ | १ | २ | १ | १ | ८ | ४ | ४ | ९ | ३९ |
| **कप्पीकृत आरक्षण ⬇** | | | | | | | | | | | | |
| **सर्वसाधारण** | २ | २ | १ | १ | १ | १ | १ | ५ | २ | २ | ५ | २३ |
| **महिला** | २ | १ | ० | ० | १ | ० | ० | २ | १ | १ | ३ | ११ |
| **खेळाडु** | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| **प्रकल्पग्रस्त** | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| **भुकंपग्रस्त** | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| **माजी सैनिक** | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ | १ | १ | ५ |
| **अंशकालीन पदवीधर** | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| **पोलीस पाल्य** | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| **गृहरक्षक दल** | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| **अनाथ** | **महिला व बाल विकास विभाग शासन निर्णय क्रमांक अनाथ २०२२/प्र.क्र.१२२का-०३, दिनांक ०६.०४.२०२३ मधील तरतुदीनुसार नुसार एकुण रिक्त पदांच्या १% इतकी पदे.** | | | | | | | | | | | |

**महत्त्वाची टीप :-**

पोलीस शिपाई चालक भरती करण्याबाबत कोणीही पैशाची किंवा अन्य कोणत्याही स्वरुपाची मागणी केल्यास संबंधीत उमेदवाराने त्याबाबतची माहिती ॲन्टी करप्शन ब्युरो, सातारा यांना दुरध्वनी क्रमांक ०२१६२-२३८१३९ वर त्वरीत संपर्क साधून तक्रार करावी. तसेच, या संदर्भात उमेदवार पोलीस अधीक्षक, सातारा या कार्यालयातील वरिष्ठ अधिकाऱ्यांशी किंवा अध्यक्ष, पोलीस शिपाई भरती समिती-२०२२-२०२३ तथा पोलीस अधीक्षक यांच्याशी संपर्क साधून तक्रार करु शकतील.

उमेदवारांना काही अडचणी भासल्यास खालील दिलेल्या हेल्पलाईन नंबरवर कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा.

| अ.क्र. | संस्था / कार्यालयाचे नाव | दुरध्वनी / मोबाईल क्रमांक |
|---|---|---|
| १. | पोलीस अधीक्षक कार्यालय, सातारा. | ०२१६२-२३४१३० |

( समीर शेख )

**पोलीस अधीक्षक, सातारा.**